218

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन,

आदिवासी विकास विभाग

# पारधी समाजासाठी राबविलेल्या योजनांचे मूल्यमापन


आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,

२८, क्वीन्स गार्डन,

महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१

दूरध्वनी क्र. ०२०-२६३६२०७१, फॅक्स क्र. ०२०-२६३६००२६

Email - trti.mah@nic.in

# पारधी समाजासाठी राबविलेल्या योजनांचे मूल्यमापन



वि (वाच) ५७०-३

# प्रस्तावना

महाराष्ट्र शासनाकडून पारधी समाजाच्या उन्नतीसाठी अनेक योजना राबविण्यात आल्या आहेत. या योजनेअंतर्गत विधवा, परीत्यक्ता स्त्रिया व दारिद्र्यरेषेखालील कुटुंबे यांना लाभ देण्यात आला आहे.

चहाची टपरी चालवणे, सुकामेवा विक्री करणे, भाजीपाला विकणे, सायकल दुरूस्ती, घरकूल, स्वाभिमान योजनेतून जमीन वाटप, दुधाळ जनावरे पुरवठा, एच.डी.ई.पी. पाईप वाटप अशा विविध योजनांच्या माध्यमातून पारधी जमातीचे जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न केला आहे.

या योजनांचे आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत मूल्यमापन करण्यात आले. हे मूल्यमापन पहाणीचे काम श्रीमती काळे, संशोधन अधिकारी, श्री. यादव, सांख्यिकी अधिकारी, श्री. पाटणकर, संशोधन सहायक श्री. गायकवाड, संशोधन सहायक व श्री. यादव, आरेखक यांनी पूर्ण केले असून अहवाल लेखनाचे काम श्रीमती काळे, संशोधन अधिकारी, यांनी श्री. यादव पी. बी., उपसंचालक यांचे मार्गदर्शनाखाली पूर्ण केले आहे.

सदर अहवाल आदिवासींच्या योजनांचे नियोजन करणे व आदिवासींच्या समस्या सोडविणे तसेच त्यांचा जीवनस्तर उंचावणे करीता विविध खात्यांना निश्चितच उपयोगी ठरेल अशी अपेक्षा आहे.

**( डॉ. अरविंदकुमार झा ),**
आयुक्त,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे १

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्रमांक | विषय | पृष्ठ क्रमांक | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत |
| | प्रस्तावना :- पारधी समाजासाठी राबविलेल्या योजनांचे मूल्यमापन | | |
| १. | मूल्यमापनाचा उद्देश | १ | १ |
| २. | क्षेत्रीय पहाणी | ३ | ५ |
| ३. | कार्यपध्दती | ७ | ७ |
| ४. | पृथःकरण | | |
| | ४.१ लाभार्थ्यांचे लिंगभेदानुसार वर्गीकरण | ९ | ११ |
| | ४.२ लाभार्थी साक्षरता | ११ | १३ |
| | ४.३ वयानुसार लाभार्थी | १५ | १५ |
| | ४.४ लाभार्थ्यांची भूधारणा | १७ | १७ |
| | ४.५ भूधारणा तपशिल (जमीन एकर मध्ये) | १९ | १९ |
| | ४.६ लाभार्थ्यांकडील पशूधन | २१ | २१ |
| | ४.७ लाभार्थ्यांच्या घरांची स्थिती | २३ | २५ |
| | ४.८ लाभार्थीच्या जमिनीची मालकी | २७ | २७ |
| | ४.९ लाभार्थीचे व्यवसायानुसार वर्गीकरण | २९ | २९ |
| | ४.१० लाभार्थींचे उत्पन्न | ३१ | ३१ |
| | ४.११ लाभार्थींना दिलेल्या योजना | ३७ | ३९ |
| | ४.१२ योजनेत मिळालेल्या लाभाची स्थिती | ४१ | ४१ |
| | ४.१३ योजनांमुळे झालेला फायदा | ४१ | ४१ |
| ५. | योजना राबविण्यात आलेल्या अडचणी व शिफारसी | ४३ | ४३ |
| ६. | निष्कर्ष | ४५ | ४५ |




वि (बाह्य) ५७०-२

# प्रकरण क्रमांक १

## मूल्यमापनाचा उद्देश

महाराष्ट्र शासनाकडून पारधी या आदिवासी जमातीसाठी विविध योजना राबविण्यात आल्या आहेत.

सदर योजना विशेष करून दारिद्र्यरेषेखालील पारधी कुटुंबांसाठी व विधवा, परित्यक्ता पारधी स्त्रियांसाठी राबवावयाच्या होत्या.

अपेक्षीत लाभार्थ्यांची सदर योजनेसाठी निवड झाली आहे का ? व निवड झालेल्या लाभार्थ्यांना योजनेच्या विहित मानकानुसार लाभ मिळाला आहे का ? सदर योजनेतून मिळालेल्या लाभामुळे लाभार्थ्यांचे रहाणीमान उंचावण्यास सहाय्य झाले आहे का ? याची पहाणी करणे तसेच योजना राबविताना काही अडचणी येतात का ? हे समजून घेणे व त्या अडचणी दूर करण्यासंदर्भात शिफारसी करणे हा या मूल्यमापनाचा प्रमुख उद्देश आहे.

## प्रकरण क्रमांक २

## क्षेत्रीय पहाणी

पारधी समाजाला दिलेल्या योजनांच्या मूल्यमापनासाठी अहमदनगर व जळगाव या जिल्ह्यातील एकूण ८ तालुक्यांतील १३३ लाभार्थ्यांची निवड करण्यात आली होती.

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेतील एकात्मिक क्षेत्र विकास कार्यक्रम कक्षातील खालील पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी मूल्यमापनासाठी सर्व्हेक्षण केले.

### तक्ता क्रमांक १

### पथक

| पहाणी केलेला जिल्हा | अ. क्र. | अधिकाऱ्याचे / कर्मचाऱ्याचे नाव | हुद्दा |
|---|---|---|---|
| १) अहमदनगर | १ | श्री. यादव एस. एम. | सांख्यिकी अधिकारी |
| | २ | श्री. पाटणकर अे. टी. | संशोधन सहाय्यक |
| २) जळगाव | १ | श्रीमती काळे अे. एस. | संशोधन अधिकारी |
| | २ | श्री. गायकवाड अे. सी. | संशोधन सहाय्यक |
| | ३ | श्री. यादव यु. एम. | आरेखक |

## तक्ता क्रमांक २

## पाहणी केलेले जिल्हे, तालुके, गावे व लाभार्थी

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | गावांची संख्या | गावाचे नाव नाव | लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | अहमदनगर | श्रीगोन्दा | ११ | | ४० |
| | | जामखेड | ६ | | २२ |
| | | कर्जत | २ | | ०६ |
| | एकूण ... | ३ | १९ | | ६८ |
| २ | जळगाव | धरणगाव | २ | धरणगाव व साळवा | २० |
| | | जामनेर | २ | शहापूर व चिंचखेड | ०३ |
| | | भुसावळ | १ | मोंढाळा, | १० |
| | | चोपडा | २ | चोगाव, घोडेगाव | १५ |
| | | अमळनेर | २ | अमळनेर, दहीवद | १७ |
| | एकूण ... | ५ | ९ | | ६५ |
| एकूण अहमदनगर व जळगाव (८ तालुके) | | | २८ | | १३३ |

# प्रकरण क्रमांक ३

## कार्यपध्दती

महाराष्ट्रातील पारधी जमातीला दिलेल्या विविध योजनांच्या लाभाची पडताळणी करण्याकरीता आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या एक्षेविका कक्षाकडून मूल्यमापन पहाणी करण्यात आली. या मूल्यमापनासाठी कुटुंबाची वैयक्तिक माहिती, कुटुंबाचा मुख्य व दुय्यम व्यवसाय, कुटुंबाची भूधारणा, कुटुंबाचे योजनेपूर्वीचे व योजनेनंतरचे उत्पन्न, कुटुंबातील व्यक्तींचे शिक्षण, आरोग्य कुटुंबाकडील पशुधन, तसेच कुटुंबाचा योजनेपूर्वीचा व योजनेनंतरचा व्यवसाय इत्यादी बाबींची माहीती घेण्यात आली.

पारधी समाजाची वस्ती असलेल्या अहमदनगर जिल्ह्यातील ३ तालुक्यांतील १९ गावातील ६८ पारधी लाभार्थी कुटुंबांची व जळगाव जिल्ह्यातील ५ तालुक्यांतील ९ गावातील ६५ पारधी लाभार्थी कुटुंबांची यादृच्छिक पध्दतीने निवड करून पहाणी करण्यात आली.

पारधी समाजाला दिलेल्या विविध योजनांच्या लाभार्थींच्या याद्या व त्यांना दिलेला लाभ या बाबतची माहिती एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, राजूर व यावल प्रकल्प कार्यालयाकडून घेण्यात आली.

यादीतील विविध बाबींसाठी लाभधारकास मिळालेल्या लाभार्थी कुटुंबांची प्रत्यक्ष भेट घेऊन पाहणी करण्यात आली.

## प्रकरण क्रमांक ४

## पृथःकरण

### (४.१) लाभार्थ्यांचे लिंगभेदानुसार वर्गीकरण


पारधी समाजातील या योजनेखालील लाभार्थ्यांचा आढावा घेतला असता पहाणी केलेल्या एकूण १३३ लाभार्थ्यांपैकी ८८ पुरुष लाभार्थी असून ४५ महिला लाभार्थी आहेत. म्हणजेच पुरुष लाभार्थी महिलांच्या दुप्पट आहेत.

**तक्ता क्रमांक ३**

**लिंग निहाय लाभार्थी**

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | एकूण | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | पुरुष | स्त्री | एकूण |
| १ | अहमदनगर | १ श्रीगोन्दा | ३१ | ९ | ४० |
| | | २ जामखेड | १४ | ८ | २२ |
| | | ३ कर्जत | ०५ | १ | ०६ |
| | | **एकूण ...** | **५०** | **१८** | **६८** |
| २ | जळगांव | १ धरणगाव | १२ | ०८ | २० |
| | | २ जामनेर | ०३ | ० | ०३ |
| | | ३ भुसावळ | ०५ | ०५ | १० |
| | | ४ चोपडा | ११ | ०४ | १५ |
| | | ५ अमळनेर | ०७ | १० | १७ |
| | | **एकूण ...** | **३८** | **२७** | **६५** |
| | एकूण २ जिल्हे | ८ तालुके | ८८ | ४५ | १३३ |

मागील तक्त्यावरून अहमदनगर जिल्ह्यात एकूण लाभार्थींपैकी जवळजवळ ७४% लाभार्थी पुरुष असून फक्त २६% लाभार्थी महिला आहेत. जळगाव जिल्ह्यात मात्र एकूण लाभार्थ्यांपैकी ५८% लाभार्थी पुरुष असून ४२% लाभार्थी महिला आहेत.




तालुकानिहाय विचार केला असता जळगाव जिल्ह्यातील अमळनेर तालुक्यात सर्वात जास्त महिला लाभार्थी असून त्यांचे प्रमाण पुरुषांपेक्षा जास्त म्हणजे ५९% आहे. भुसावळ तालुक्यात ते ५०% आहे. तर धरणगाव व चोपडा तालुक्यात अनुक्रमे ते ४०% व २७ % आहे. तसेच अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यात ते प्रमाण ३६% आहे. अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यात हे प्रमाण २२% व कर्जत तालुक्यात १७%आहे. जळगाव जिल्ह्यात एकही महिला लाभार्थी नाही.

जळगाव जिल्ह्यात पारधी समाजातील महीलांना योजनेचा लाभ देताना डावलले गेलेले दिसते.


## (४.२) लाभार्थी साक्षरता

तक्ता क्र.४

### लाभार्थ्यांची साक्षरता

| | | साक्षर | | निरक्षर | | एकूण | | एकूण लाभार्थी | साक्षरता% | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जिल्हा | तालुका | पु | स्त्री | पु | स्त्री | पु | स्त्री | | पु | स्त्री | एकूण |
| अहमदनगर | १ श्रीगोन्दा | १५ | १ | १६ | ०८ | ३१ | ९ | ४० | ४८ | ११ | ४० |
| | २ जामखेड | ०४ | ३ | १० | ०५ | १४ | ८ | २२ | २९ | ३८ | ३१ |
| | ३ कर्जत | ०३ | ० | ०२ | ०१ | ०५ | १ | ०६ | ६० | ० | ५० |
| | **एकूण ...** | **२२** | **४** | **२८** | **१४** | **५०** | **१८** | **६८** | **४४** | **२२** | **३८** |
| जळगाव | १ धरणगाव | ०६ | २ | ०६ | ०६ | १२ | ०८ | २० | ५० | २५ | ४० |
| | २ जामनेर | ०२ | ० | ०१ | ० | ०३ | ० | ०३ | ६६ | ० | ६६ |
| | ३ भुसावळ | ०३ | ०२ | ०२ | ०३ | ०५ | ०५ | १० | ६० | ४० | ५० |
| | ४ चोपडा | ०७ | ०१ | ०४ | ०३ | ११ | ०४ | १५ | ६३ | २५ | ५३ |
| | ५ अमळनेर | ०५ | ०३ | ०२ | ०७ | ०७ | १० | १७ | ७१ | ३० | ४७ |
| | **एकूण ...** | **२३** | **८** | **१५** | **१९** | **३८** | **२७** | **६५** | **६०** | **३०** | **४८** |
| एकूण २ जिल्हे | ८ तालुके | ४५ | १२ | ४३ | ३३ | ८८ | ४५ | १३३ | ५१ | २६ | ४३ |

पारधी समाजाला या योजनेखालील दिलेल्या लाभार्थी पैकी ४३% लाभार्थी साक्षर आहेत. लाभार्थ्यांमध्ये साक्षर पुरुषांचे प्रमाण साक्षर महिलांच्या दुप्पट आहे. एकूण पुरुष लाभार्थ्यांपैकी साक्षर व निरक्षर लाभार्थ्यांचे प्रमाण सारखेच आहे पण एकूण महिला लाभार्थ्यांपैकी ७४% महिला लाभार्थी निरक्षर असून फक्त २६% महिला लाभार्थी साक्षर आहेत.




दोन्ही जिल्ह्यांत साक्षर पुरुषांचे प्रमाण महिला लाभार्थींच्या दुप्पट आहे. मात्र जळगाव जिल्ह्यापेक्षा अहमदनगर जिल्ह्यात साक्षरतेचे प्रमाण जास्त आहे. दोन्ही जिल्ह्यांतील एकूण साक्षर लाभार्थ्यांपैकी साक्षर पुरुष लाभार्थ्यांचे प्रमाण दोन्ही जिल्हयांत सारखेच असले तरी साक्षर महिला लाभार्थींचे प्रमाण अहमदनगर जिल्ह्यात ६७%आहे तर जळगाव जिल्ह्यात ३३%आहे.

एकूण साक्षरतेचा तालुकानिहाय विचार केला असता अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यात साक्षरतेचे प्रमाण सर्वात जास्त आहे, असे दिसत असले तरी जामखेड तालुक्यातील लाभार्थी संख्या फार अल्प आहे व त्यातही महिला लाभार्थी एकही नाही. चोपडा तालुक्यात साक्षरतेचे प्रमाण वस्तुतः जास्त आहे. त्या खालोखाल भुसावळ व कर्जत तालुक्याचा क्रमांक लागतो.

पुरुष साक्षरतेचा विचार करता जळगाव जिल्ह्यातील अमळनेर तालुक्यात पुरुष साक्षरतेचे प्रमाण सर्वात जास्त म्हणजे ७१% आहे. त्यानंतर जामखेड, चोपडा, भुसावळ व कर्जतचा क्रमांक लागतो. श्रीगोंदा तालुक्यातील जवळजवळ निम्मे पुरुष लाभार्थी साक्षर असून जामखेड तालुक्यात मात्र केवळ २९% पुरुष लाभार्थी साक्षर आहेत.

महिला साक्षरता विचारात घेतली असता भुसावळ तालुक्यात सर्वात जास्त म्हणजे ४०% महिला लाभार्थी साक्षर आहेत. तर जामखेड तालुक्यात हे प्रमाण ३८% आहे. उर्वरीत तालुक्यात हे प्रमाण २२ ते ३०% चे दरम्यान असून श्रीगोंदा तालुक्यात मात्र महिला लाभार्थींच्या साक्षरतेचे प्रमाण फक्त ११% इतके नगण्य आहे.

पारधी समाजातील लाभार्थींची एकूण साक्षरता कमी आहेच पण महिला साक्षरतेचे अल्प प्रमाण पारधी समाजाच्या मागासलेपणाची कारणे अधोरेखीत करते.

## (४.३) वयानुसार लाभार्थी

**तक्ता क्रमांक ५**

**वयानुसार लाभार्थी**

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | १८ ते २५ | | २५ ते ५० | | ५० चे पुढे | | एकूण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पु | स्त्री | पु | स्त्री | पु | स्त्री | पु | स्त्री | एकूण |
| १) | अहमदनगर | १ श्रीगोन्दा | ३ | १ | २५ | ६ | ३ | २ | ३१ | ९ | ४० |
| | | २ जामखेड | - | - | १० | ५ | ४ | ३ | १४ | ८ | २२ |
| | | ३ कर्जत | - | - | ०५ | १ | - | - | ०५ | १ | ०६ |
| | | **एकूण ...** | **३** | **१** | **४०** | **१२** | **७** | **५** | **५०** | **१८** | **६८** |
| २) | जळगाव | १ धरणगाव | १ | ३ | ८ | ५ | ३ | - | १२ | ०८ | २० |
| | | २ जामनेर | १ | - | २ | - | - | - | ०३ | ०० | ०३ |
| | | ३ भुसावळ | ४ | १ | १ | ३ | - | १ | ०५ | ०५ | १० |
| | | ४ चोपडा | २ | - | ९ | ४ | - | - | ११ | ०४ | १५ |
| | | ५ अमळनेर | ३ | २ | ४ | ७ | १ | - | ०७ | १० | १७ |
| | | **एकूण ...** | **११** | **६** | **२४** | **१९** | **४** | **१** | **३८** | **२७** | **६५** |
| | **एकूण २ जिल्हे** | **८ तालुके** | **१४** | **०७** | **६४** | **३१** | **११** | **०६** | **८८** | **४५** | **१३३** |

पारधी समाजाला योजनेचा लाभ देण्यासाठी लाभार्थ्यांची निवड करताना लाभार्थ्यांच्या वयाचा विचार करण्यात आला आहे. असे वरील तक्त्यावरुन स्पष्ट होते .

एकूण लाभ दिलेल्या १३३ लाभार्थ्यांपैकी ९५ म्हणजे ७१% लाभार्थी २५ ते ५० वयोगटातील होते. लाभार्थ्यांपैकी २१ म्हणजे १६% लाभार्थी १८ ते २५ वयोगटातील होते व ५० चे पुढे वय असलेले लाभार्थी फक्त १३% होते.

पारधी समाजाला विविध व्यवसाय करण्यास साहाय्य व्हावे म्हणून शासनाकडून अनुदान देण्यात आले होते व त्याचा जास्त उपयोग २५ ते ५० वयाच्या व्यक्तीच करू शकत असल्याने जास्तीत जास्त याच वयोगटातील लाभार्थींची निवड झालेली दिसते.

अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील १००% लाभार्थी याच गटातील असून जळगाव जिल्ह्यातील चोपडा तालुक्यातील ८७% लाभार्थी या गटातील आहेत. दोन्ही जिल्हयांतील उर्वरीत तालुक्यात हे प्रमाण ४० ते ६५% चे दरम्यान आहे.

या खालोखाल लाभार्थी १८ ते २५ वयोगटातील असून अपेक्षेप्रमाणे ५० चे पुढील वयाचे एकूण लाभार्थी १३% आहेत. जामखेड, धरणगाव या तालुक्यात हे प्रमाण ३३% चे आसपास आहे.



वि (वाय) ५५० - ४


## (४.४) लाभार्थ्यांची भूधारणा :-

**तक्ता क्रमांक ६**

**लाभार्थ्यांची भूधारणा**

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | लाभार्थी संख्या | एकूण भूधारक | एकूण भूमीहीन |
|---|---|---|---|---|---|
| १) | अहमदनगर | १ श्रीगोन्दा | ४० | ३१ | ०९ |
| | | २ जामखेड | २२ | ०९ | १३ |
| | | ३ कर्जत | ०६ | ०६ | - |
| | | **एकूण ...** | **६८** | **४६** | **२२** |
| २) | जळगाव | १ धरणगाव | २० | - | २० |
| | | २ जामनेर | ०३ | ०१ | ०२ |
| | | ३ भुसावळ | १० | ०१ | ०९ |
| | | ४ चोपडा | १५ | ०६ | ०९ |
| | | ५ अमळनेर | १७ | ०४ | १३ |
| | | **एकूण ...** | **६५** | **१२** | **५३** |
| | **एकूण २ जिल्हे** | **८ तालुके** | **१३३** | **५८** | **७५** |

निवड केलेल्या १३३ पारधी लाभार्थींपैकी ५८ लाभार्थी भूधारक असून ७५ लाभार्थी भूमीहीन होते. म्हणजेच एकूण लाभार्थींपैकी ४४% लाभार्थी भूधारक असून ५६% लाभार्थी भूमिहीन होते.



अहमदनगर जिल्ह्यात भूधारक लाभार्थी ६८% असून भूमिहीन लाभार्थी ३२% आहेत. तर जळगाव जिल्ह्यात भूधारणेचे प्रमाण फक्त १८% असून भूमीहीन लाभार्थ्यांचे प्रमाण ८२% इतके मोठे आहे. म्हणजेच जळगाव जिल्ह्याचे चित्र अहमदनगर जिल्ह्याच्या बरोबर उलट आहे.

भूधारक लाभार्थ्यांच्या तालुकानिहाय संख्येकडे नजर टाकली असता अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात सर्वच म्हणजे १००% लाभार्थी भूधारक आहेत. श्रीगोंदा तालुक्यात हे प्रमाण ७७% असून जामखेड तालुक्यात मात्र हे प्रमाण ४०% आहे.

या उलट जळगाव जिल्ह्यात चोपडा तालुक्यात सर्वात जास्त म्हणजे ४०% भूधारक आहेत. त्या खालोखाल जामनेर तालुक्यात ३३% भूधारक असून अमळनेर तालुक्यात हे प्रमाण २३% आहे. भूसावळ तालुक्यात १०% लाभार्थी भूधारक असून धरणगाव तालुक्यातील एकही लाभार्थी भूधारक नाही. याचाच अर्थ धरणगाव तालुक्यामधील १००% लाभार्थी भूमीहीन आहेत.

लाभार्थी भूधारक असतील तर त्यांना उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध होते.

## (४.५) भूधारणा तपशील

**तक्ता क्रमांक ७**

(जमीन एकरमध्ये)

| जिल्हा | तालुका | एकूण भूधारक | मालकीची | | खंडाची | | जंगलखाते | | इतर | एकूण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | बागायत | जिरायत | बागायत | जिरायत | बागायत | जिरायत | | बा. | जि. | एकूण |
| अहमदनगर | १ श्रीगोन्दा | ३१ | २२ | ७ | - | - | - | १ | - | २२ | | |
| | २ जामखेड | ०९ | ०४ | ५ | - | - | - | - | - | ०४ | | |
| | ३ कर्जत | ०६ | ०४ | २ | - | - | - | - | - | ०४ | | |
| | **एकूण ...** | **४६** | **३०** | **१४** | - | - | - | **१** | - | **३०** | | |
| जळगाव | १ धरणगाव | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | २ जामनेर | ०१ | - | ११ | - | - | - | - | - | - | ११ | ११ |
| | ३ भुसावळ | ०१ | - | ०२ | - | ०५ | - | - | - | - | ०७ | ०७ |
| | ४ चोपडा | ०६ | - | २६ | - | - | - | - | - | - | २६ | २६ |
| | ५ अमळनेर | ०४ | १.५ | ०२ | - | ०२ | - | - | - | १.५ | ०२ | ०३.५ |
| | **एकूण ...** | **१२** | **१.५** | **४१** | - | **०७** | - | - | - | **१.५** | **४६** | **४७.५** |
| **एकूण २ जिल्हे** | **८ तालुके** | **५८** | **३१.५** | **५५** | **०** | **०७** | - | **१** | - | **३१.५** | **४६** | **४७.५** |

## (४.६) लाभार्थ्यांकडील पशुधन

**तक्ता क्रमांक ८**

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | लाभार्थी संख्या | गाई | म्हैस | बैल | रेडा | शेळ्या | कोंबड्या | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | अहमदनगर | १ श्रीगोन्दा | ४० | ८ | - | ३ | १ | २९ | - | १० |
| | | २ जामखेड | २२ | - | १ | - | १ | ४१ | - | - |
| | | ३ कर्जत | ०६ | - | - | - | - | ०२ | - | - |
| | | **एकूण ...** | **६८** | **८** | **१** | **३** | **२** | **७२** | **-** | **१०** |
| २) | जळगाव | १ धरणगाव | २० | - | - | - | - | १ | - | - |
| | | २ जामनेर | ०३ | - | - | - | - | - | - | - |
| | | ३ भुसावळ | १० | २ | - | - | - | - | - | - |
| | | ४ चोपडा | १५ | १ | ६ | ३ | - | २ | - | - |
| | | ५ अमळनेर | १७ | - | २ | - | - | - | - | - |
| | | **एकूण ...** | **६५** | **३** | **८** | **३** | **-** | **३** | **-** | **-** |
| | **एकूण २ जिल्हे** | **८ तालुके** | **१३३** | **११** | **९** | **६** | **२** | **७५** | **-** | **१०** |

पारधी समाजाला योजना दिलेल्या १३३ लाभार्थ्यांकडे मिळून ११ गाई, ९ म्हैसी, ६ बैल, ७५ शेळ्या व १० डुकरे इत्यादी पशुधन आहे. पशुधनाची ही संख्या अगदी नगण्य आहे.

अहमदनगर व जळगाव ह्या दोन्ही जिल्ह्यात हे प्रमाण साधारणपणे सारखेच असून अहमदनगर जिल्ह्यात फक्त शेळ्या व इतर पशुधन जास्त आहे. जळगाव जिल्ह्यात शेळ्यांची संख्या अगदी अल्प आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यात गाई, म्हैसी, रेडे व बैल अशी १२ मोठी जनावरे असून २९ शेळ्या व इतर १० जनावरे आहेत. जामखेड तालुक्यात २ मोठी जनावरे व ४१ शेळ्या आहेत. तर कर्जत तालुक्यातील निवडलेल्या ६ लाभार्थ्यांकडे २ शेळ्या वगळता अन्य पशुधन अजिबात नाही.


जळगाव जिल्ह्यातील चोपडा तालुक्यात ९ मोठी जनावरे व २ शेळ्या आहेत. भुसावळ तालुक्यात फक्त २ गाई व अमळनेर तालुक्यात २ म्हैसी आहेत. जळगाव जिल्ह्यातील अन्य तालुक्यात कोणत्याही प्रकारचे पशुधन नाही. पशुधनाची ही नगण्य संख्या लाभार्थीची विपन्नता दर्शविते.

## (४.७) लाभार्थ्यांच्या घरांची स्थिती

**तक्ता क्रमांक ९**

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | लाभार्थी संख्या | कच्चे | अर्ध कच्चे | पक्के | | बेघर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | स्वतःचे | शासनाचे | |
| १ | अहमदनगर | १ श्रीगोन्दा | ४० | ३१ | - | २ | ५ | २ |
| | | २ जामखेड | २२ | १४ | १ | ५ | २ | - |
| | | ३ कर्जत | ०६ | ०६ | - | - | - | - |
| | | **एकूण ...** | **६८** | **५१** | **१** | **७** | **७** | **२** |
| २ | जळगांव | १ धरणगाव | २० | ४ | १२ | २ | २ | - |
| | | २ जामनेर | ०३ | - | २ | १ | - | - |
| | | ३ भुसावळ | १० | ५ | ३ | २ | - | - |
| | | ४ चोपडा | १५ | ७ | ५ | २ | १ | - |
| | | ५ अमळनेर | १७ | २ | २ | ७ | ६ | - |
| | | **एकूण ...** | **६५** | **१८** | **२४** | **१४** | **९** | **-** |
| | एकूण २ जिल्हे | ८ तालुके | **१३३** | **६९** | **२५** | **२१** | **१६** | **२** |

पारधी समाजाच्या योजना दिलेल्या १३३ लाभार्थीपैकी फक्त ३७ लाभार्थींची घरे पक्क्या स्वरूपाची आहेत. हे प्रमाण २८% आहे. त्यापैकी ५६% लाभार्थींची घरे स्वतःची असून ४४% लाभार्थींना पक्की घरे शासनाने दिलेली आहेत. याचा दुसरा अर्थ असा की स्वतः पक्की घरे बांधण्याची कुवत फक्त १६% लाभार्थींची आहे.



एकूण लाभार्थींपैकी ७२% लाभार्थींची घरे कच्च्या स्वरुपाची आहेत व एकूण कच्च्या घरांपैकी ७३% घरे सर्वस्वी कच्ची असून २७% घरे अर्धकच्च्या स्वरुपाची आहेत.

घरांची ही परिस्थिती पारधी समाजाच्या आर्थिक स्थितीवर प्रकाश टाकणारी आहे.

अहमदनगर जिल्ह्यात २०% घरे पक्की असून जळगाव जिल्ह्यात ३५% घरे पक्की आहेत.

तालुकानिहाय घरांच्या स्थितीचा विचार केला असता सर्वात जास्त म्हणजे ७६% पक्की घरे जळगाव जिल्ह्यात अमळनेर तालुक्यात आहेत. त्यातील ५४% घरे स्वतःची असून ४६% घरे शासनाने दिलेली आहेत. याच जिल्ह्यातील जामनेर तालुक्यातील व अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील पक्क्या घरांचे प्रमाण ३३% आहे. विशेष म्हणजे जामखेड तालुक्यात ७०% लाभार्थींनी स्वतः पक्की घरे बांधली आहेत. या शिवाय जळगाव जिल्ह्यातील धरणगाव, चोपडा व भुसावळ तालुक्यात २०% घरे पक्की आहेत. अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यात हे प्रमाण फक्त १६% आहे. तर कर्जत तालुक्यात सर्वच्या सर्व ६ लाभार्थींची घरे १००% कच्ची आहेत.

अहमदनगर जिल्ह्यात ८०% घरे कच्ची असून जळगाव जिल्ह्यात हे प्रमाण ६५% आहे. अहमदनगर जिल्ह्यातील कच्च्या घरांपैकी **९८% घरे संपूर्ण कच्ची** असून २% अर्ध कच्ची घरे जामखेड तालुक्यातील आहेत.

तर जळगाव जिल्ह्यात संपूर्ण कच्ची घरे ४३% आहेत व अर्ध कच्ची घरे ५७% आहेत. म्हणजे अहमदनगर जिल्ह्यापेक्षा जळगाव जिल्ह्याची स्थिती बरी आहे असे म्हणता येईल. जळगाव जिल्ह्यातील धरणगाव तालुक्यातील एकूण कच्च्या घरातील २५% घरे पूर्ण कच्ची असून ७५% अर्ध कच्ची आहेत. जामनेर तालुक्यात एकही घर पूर्ण कच्चे नाही. मात्र पुर्ण कच्च्या घरांचे प्रमाण भुसावळ तालुक्यात ६३%,चोपडा तालुक्यात ५८% व अमळनेर तालुक्यात ५०% आहे. नोंद घेण्याची बाब म्हणजे **२ लाभार्थी बेघर** आहेत. म्हणजे थोडक्यात पारधी समाजाच्या लाभार्थींची घरांची स्थिती अत्यंत वाईट आहे.

## (४.८) लाभार्थींच्या जमिनीची मालकी

**तक्ता क्रमांक १०**

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | एकूण भूधारक | मालकीची | | खंडाची | | जंगलखाते | | इतर | एकूण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | बागायत | जिरायत | बागायत | जिरायत | बागायत | जिरायत | | बागायत | जिरायत | एकूण |
| १ | अहमदनगर | १ श्रीगोन्दा | ३१ | २२ | ७ | - | - | - | १ | - | २२ | ०८ | ३०.० |
| | | २ जामखेड | ०९ | ०४ | ५ | - | - | - | - | - | ०४ | ०५ | ०९.० |
| | | ३ कर्जत | ०६ | ०४ | २ | - | - | - | - | - | ०४ | ०२ | ०६.० |
| | | **एकूण ...** | **४६** | **३०** | **१४** | - | - | - | **१** | - | **३०** | **१५** | **४५.०** |
| २ | जळगांव | १ धरणगाव | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | | २ जामनेर | ०१ | - | ११ | - | - | - | - | - | - | ११ | ११.० |
| | | ३ भुसावळ | ०१ | - | ०२ | - | ०५ | - | - | - | - | ०७ | ०७.० |
| | | ४ चोपडा | ०६ | - | २६ | - | - | - | - | - | - | २६ | २६.० |
| | | ५ अमळनेर | ०४ | १.५ | ०२ | - | ०२ | - | - | - | १.५ | ०४ | ०५.५ |
| | | **एकूण ...** | **१२** | **१.५** | **४१** | - | **०७** | - | - | - | **१.५** | **४८** | **४९.५** |
| | **एकूण २ जिल्हे** | **८ तालुके** | **५८** | **३१.५** | **५५** | **०** | **०७** | - | **१** | - | **३१.५** | **६३** | **९४.५** |

अहमदनगर जिल्ह्यात एकूण ४६ लाभार्थींकडे मिळून ४५ एकर जमीन आहे. त्यापैकी ३० एकर बागायत (६७%) व १५ एकर (३३%) जिरायत आहे. या ४५ एकर जमिनीपैकी जंगल खात्याची १ एकर जमीन वगळता उर्वरीत सर्व जमीन लाभार्थ्यांच्या स्वतःच्या मालकीची आहे. या जिल्ह्यातील लाभार्थींकडे खंडाची जमीन अजिबात नाही.

अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यात ३१ लाभार्थींकडे ३० एकर जमीन आहे.जामखेड व कर्जत तालुक्यात प्रती लाभार्थी सरासरी १ एकर जमीन आहे.

एकूण ३० एकर बागायत जमिनीपैकी ७४% जमीन एकट्या श्रीगोंदा तालुक्यात असून जामखेड व कर्जत तालुक्यात प्रत्येकी १३ एकर बागायत जमीन आहे. खरेतर अहमदनगर जिल्ह्यात प्रत्येकी १ एकर बागायत जमीन असल्याने त्यांची आर्थिक विपन्नता नसावी असे वाटते. परंतु घरांच्या स्थितीवरून असे वाटत नाही. जळगाव जिल्ह्यातील एकूण १२ भूधारकांकडे १.५ एकर बागायत व ४१ एकर जिरायत जमीन स्वतःच्या मालकीची आहे. याशिवाय खंडाची ७ एकर जिरायत अशी एकूण १.५ एकर बागायत व ४८ एकर जिरायत जमीन आहे. जिरायत व बागायत मिळून ४९.५ एकर जमीन जळगाव जिल्ह्यातील पारधी समाजाच्या लाभार्थींना शेती करण्यासाठी उपलब्ध आहे.

जळगाव जिल्ह्यातील जामनेर तालुक्यात सर्वात जास्त म्हणजे एका भूधारकाकडे ११ एकर जिरायत जमीन आहे. या खालोखाल भुसावळ तालुक्यात एका लाभार्थीकडे ७ एकर जिरायत जमीन आहे. चोपडा तालुक्यात एका लाभार्थीकडे ४.३३ एकर जिरायत जमीन आहे. अमळनेर तालुक्यात एका लाभार्थीकडे १.३३ एकर जमीन आहे. तर धरणगाव तालुक्यात एकाही लाभार्थीकडे जमीन नाही.

जळगाव जिल्ह्यातील फक्त अमळनेर तालुक्यात १.५ एकर बागायत जमीन आहे , अन्य तालुक्यात बागायत भूधारक एकही नाही.

## (४.९) लाभार्थींचे व्यवसायानुसार वर्गीकरण

**तक्ता क्रमांक ११**

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | लाभार्थी संख्या | व्यवसाय | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | शेती | शेत मजुरी | मजुरी | नोकरी | व्यवसाय |
| १) | अहमदनगर | १ श्रीगोन्दा | ४० | ८ | २० | १० | - | २ |
| | | २ जामखेड | २२ | ४ | ०६ | १० | १ | १ अपंग |
| | | ३ कर्जत | ०६ | ४ | ०२ | - | - | - |
| | | **एकूण ...** | **६८** | **१६** | **२८** | **२०** | **१** | **३** |
| २) | जळगाव | १ धरणगाव | २० | - | १ | १३ | - | ६ |
| | | २ जामनेर | ०३ | २ | १ | - | - | - |
| | | ३ भुसावळ | १० | - | १ | ०९ | - | - |
| | | ४ चोपडा | १५ | - | - | १० | - | ५ |
| | | ५ अमळनेर | १७ | - | १ | १३ | - | ३ |
| | | **एकूण ...** | **६५** | **२** | **४** | **४५** | **-** | **१४** |
| | **एकूण २ जिल्हे** | **८ तालुके** | **१३३** | **१८** | **३२** | **६५** | **१** | **१७** |


एकूण १३३ लाभार्थीपैकी जवळ जवळ निम्मे म्हणजे ६५ लाभार्थी मोलमजुरीवर उपजिविका चालवतात. त्यांना त्यांच्या मालकीची जमीन नसल्याने ते शेती करू शकत नाहीत. तसेच शिक्षणा अभावी नोकरी व्यवसाय ही करू शकत नाहीत. त्या खालोखाल शेतमजुरी व व्यवसाय करणाऱ्यांचे प्रमाण २४% असून १४% लाभार्थी शेती करतात. फक्त १ लाभार्थी नोकरी करतो.

मात्र व्यवसाय करणाऱ्या लाभार्थींचे प्रमाण जळगाव जिल्ह्यात जास्त असून तेथे ते २२% आहे. येथे लाभार्थी किराणा माल, सुकामेवा, भाजीपाला, मसाला इत्यादी मालाच्या विक्रीचा व्यवसाय करतात. तर ६९% लाभार्थी मजुरी करणारे आहेत. परंतु अहमदनगर जिल्ह्यात २४% लाभार्थी शेती करत असून २९% लाभार्थी मजुरी व ४१% लाभार्थी शेतमजुरी करतात. शेतमजुरी वा मजुरी करण्याकरीता कोणत्याही विशेष कौशल्याची गरज नसते. म्हणून जास्त प्रमाणात लाभार्थी या गटात अंतर्भूत होतात.


## (४.१०) लाभार्थींचे उत्पन्न

**तक्ता क्रमांक १२**

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | लाभार्थी संख्या | वार्षिक उत्पन्नानुसार वर्गीकरण | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | १० ह. पेक्षा कमी | १० ते १५ | १५ ते २० | २० ते २५ | २५ ते ५० | ५० चे वर |
| १) | अहमदनगर | १ श्रीगोन्दा | ४० | १९ | १६ | ५ | - | - | - |
| | | २ जामखेड | २२ | ०८ | ०९ | ३ | १ | - | १ |
| | | ३ कर्जत | ०६ | ०२ | ०१ | ३ | | | |
| | | **एकूण ...** | **६८** | **२९** | **२६** | **११** | **१** | **-** | **१** |
| २) | जळगाव | १ धरणगाव | २० | - | २ | ३ | ७ | ७ | १ |
| | | २ जामनेर | ०३ | - | - | - | - | ३ | - |
| | | ३ भुसावळ | १० | - | - | - | ८ | २ | - |
| | | ४ चोपडा | १५ | - | - | ३ | २ | ८ | २ |
| | | ५ अमळनेर | १७ | - | १ | - | ४ | १२ | - |
| | | **एकूण ...** | **६५** | **-** | **३** | **६** | **२१** | **३२** | **३** |
| | **एकूण २ जिल्हे** | **८ तालुके** | **१३३** | **२९** | **२९** | **१७** | **२२** | **३२** | **४** |




एकूण १३३ लाभार्थीपैकी जळगाव जिल्ह्यातील लाभार्थींची सांपत्तिक स्थिती अहमदनगर जिल्ह्यातील लाभार्थीपेक्षा अधिक चांगली असल्याचे जाणवते. जळगाव जिल्ह्यातील ५०% लाभार्थींचे वार्षिक उत्पन्न रु. २५ ते ५० हजारांचे दरम्यान आहे. ३३% लाभार्थींचे उत्पन्न रु. २० ते २५ हजारांचे दरम्यान आहे. म्हणजेच ८३% लाभार्थी महिना किमान २ हजार रु. उत्पन्न मिळवतात. मात्र अहमदनगर जिल्ह्यातील ४३% लाभार्थींचे वार्षिक उत्पन्न रु. १० हजारांपेक्षा कमी व ३८% लाभार्थींचे वार्षिक उत्पन्न रु. १० ते १५ हजारांचे दरम्यान असल्याचे आढळते. १६% लाभार्थी रु. १५ ते २० हजारचे दरम्यान उत्पन्न मिळवतात. एकूणच अहमदनगर जिल्ह्यातील लाभार्थींची स्थिती अधिकच हालाखीची आहे.




## तक्ता क्र.१३

### योजनानिहाय लाभार्थी

### जि.अहमदनगर

| तालुका | एकूण लाभार्थी | घरकुल | स्वाभिमान | दुधाळ जनावरे | H.D.P.E. पाईप |
|---|---|---|---|---|---|
| १) श्रीगोंदा | ४० | ११ | १६ | १३ | - |
| २) जामखेड | २२ | १२ | ०३ | - | ०७ |
| ३) कर्जत | ०६ | - | - | - | ०६ |
| **एकूण जिल्हा** | **६८** | **२३** | **१९** | **१३** | **१३** |

अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा, जामखेड व कर्जत या ३ तालुक्यांतील ६८ लाभार्थींची पहाणी करण्यात आली. त्यापैकी २३ लाभार्थ्यांना घरकुल, १९ लाभार्थींना स्वाभिमान योजना व १३ लाभार्थींना दुधाळ जनावरे व शेळी गट वाटप ह्या योजना देण्यात आल्या, तर १३ लाभार्थींना HDPE पाईप ही योजना देण्यात आली.

सर्वात जास्त घरकुल योजनेचे लाभार्थी असून पैकी ११ लाभार्थी श्रीगोंदा तालुक्यातील व १२ लाभार्थी जामखेड तालुक्यातील आहेत.

त्या खालोखाल १९ लाभार्थींना स्वाभिमान योजनेचा लाभ देण्यात आला.त्यातील १६ लाभार्थी श्रीगोंदा तालुक्यातील आहेत व फक्त ३ लाभार्थी जामखेड तालुक्यातील आहेत.

दुधाळ जनावरे वाटप ही योजना केवळ श्रीगोंदा तालुक्यात देण्यात आली.

HDPE पाईप ही योजना एकूण १३ लाभार्थींना देण्यात आली. ७ लाभार्थी जामखेड तालुक्यातील व ६ लाभार्थी कर्जत तालुक्यातील आहेत. श्रीगोंदा तालुक्यातील एकाही लाभार्थ्याला ही योजना देण्यात आली नाही.

**स्वाभिमान योजना** अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील ४० लाभार्थींपैकी ३१ लाभार्थी भूधारक आहेत. त्यात स्वाभिमान योजना देण्यात आलेल्या एकूण १६ लाभार्थ्यांचा समावेश आहे. म्हणजेच २४ लाभार्थी भूमिहीन आहेत. लाभधारकांमध्ये ४ स्त्रिया व १२ पुरुष आहेत. त्यापैकी ७ लाभार्थींचे उत्पन्न १० हजारापेक्षा कमी व ८ लाभार्थींचे उत्पन्न १० ते २५ हजारचे दरम्यान आहे. ९ लाभार्थी शेतमजुरी करत असून ७ लाभार्थी मजुरी करत असत. अहमदनगर जिल्ह्यातील उर्वरित तालुक्यात ही योजना दिलेली नाही.

## (४.११) लाभार्थींना दिलेल्या योजना

**तक्ता क्रमांक १४**

**योजनानिहाय लाभार्थी**

**जिल्हा जळगाव**

| तालुका | एकूण लाभार्थी | किराणा दुकान | घर घंटी | चहाची/ पानाची टपरी | सुकामेवा | भाजीपाला/ फळे विक्री | सायकल दुरुस्ती | केळी वेफर्स |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ धरणगाव | २० | ० | ० | २ | १४ | ३ | १ | ० |
| २ जामनेर | ०३ | २ | १ | ० | ० | ० | ० | ० |
| ३ भुसावळ | १० | १ | ० | ० | १ | ६ | २ | ० |
| ४ चोपडा | १५ | १ | ० | २ | ९ | २ | १ | ० |
| ५ अमळनेर | १७ | ० | ० | ४ | ३ | ५ | ३ | २ |
| **एकूण जिल्हा** | **६५** | **४** | **१** | **८** | **२७** | **१६** | **७** | **२** |

जळगाव जिल्ह्यातील एकूण ६५ लाभार्थ्यांपैकी २७ लाभार्थींना सुकामेवा, १६ लाभार्थींना भाजीपाला, ८ लाभार्थींना चहाची / पानाची टपरी, ७ लाभार्थींना सायकल दुरुस्ती व १ लाभार्थ्यास घरघंटी (पिठाची गिरणी) या योजना देण्यात आल्या. तसेच ४ लाभार्थींना किराणा दुकान व २ लाभार्थींना केळी वेफर्स विक्री या योजना देण्यात आल्या.

सर्वात जास्त सुकामेवा विक्री या योजनेला आर्थिक सहाय्य देण्यात आले असून त्या खालोखाल भाजीपाला विक्रीसाठी आर्थिक सहाय्य देण्यात आले. सुकामेवा व भाजीपाला नंतर चहाच्या/पान टपरी साठी लाभार्थींनी पसंती दाखवली असून सायकल दुरुस्तीसाठी सहाय्य घेण्याचा क्रम त्यानंतर लागला. किराणा दुकान योजनेलाही ४ लाभार्थींनी पसंती दाखवली. घरघंटी साठी फक्त १ लाभार्थ्याने मदत घेतली.

एकूण लाभ घेणाऱ्या लाभार्थींपैकी सुकामेवा ही योजना घेणारे सर्वात जास्त म्हणजे ४१% लाभार्थी असून त्यापैकी ५१% लाभार्थी एकट्या धरणगाव तालुक्यात आहेत. त्या नंतर चोपडा तालुक्याचा क्रम लागतो. या तालुक्यात ३३% लाभार्थी आहेत. प्रत्येकी ११% लाभार्थी अमळनेर तालुक्यात आहेत व भुसावळ तालुक्यात ४% लाभार्थी आहेत.

सुकामेवा या योजनेचा लाभ घेणारे लाभार्थी यापूर्वीही सुकामेवा विक्रीचा व्यवसाय करतच होते. योजनेचा लाभ घेतल्याने त्यांना अधिक भांडवल मिळाले.

जळगाव जिल्ह्यातील धरणगाव तालुक्यातील २१ लाभार्थ्यांनी या योजनेंतर्गत मिळालेल्या अनुदानाचा वापर करून क्वचित अपवाद वगळता योग्य उपयोग करून घेऊन आपल्या व्यवसायास स्थिरस्थावर केले. काहींनी नव्याने व्यवसाय सुरू केला.

जळगाव जिल्ह्यातील जामनेर तालुक्यातील ३ लाभार्थींनी लाभ घेतला. परंतु एकानेही मिळालेल्या अनुदानाचा योग्य विनियोग केला नाही. या लाभार्थींनी दुकान न टाकता घरखर्चासाठी अनुदान खर्च केले.

भुसावळ व चोपडा तालुक्यातील २५ लाभार्थींपैकी २ लाभार्थी वगळता इतर सर्व लाभार्थींनी व्यवसायासाठी अनुदान वापरले. योजनेमुळे रोजगार उपलब्ध झाला व रोजीरोटीचा प्रश्न सुटला असे अनुमान निघाले.

अमळनेर तालुक्यातील १७ लाभार्थींनी घेतलेल्या अनुदानातील चहाच्या टपरीसाठी घेतलेले अनुदान एका लाभार्थ्याने व्यक्तीगत खर्च भागविण्यासाठी वापरले. अन्य लाभार्थींनी अनुदान घेण्याचा हेतू सफल केला.

## तक्ता क्रमांक १५

## स्वाभिमान योजनेच्या लाभार्थींचे तपशील

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **लाभार्थी** | **संख्या** | | कब्जा पावती | मिळालेले | ०८ |
| **पुरुष** | १२ | | | न मिळालेले | ०८ |
| **स्त्री** | ४ | | जमीन मोजणी | केली | ०४ |
| आधिचा व्यवसाय | शेती | -- | | केली नाही | १२ |
| | शेतमजुरी | ९ | ७/१२ च्या नोंदी झालेल्या | होय | ११ |
| | मजुरी | ७ | | नाही | ०५ |
| | व्यवसाय | -- | शासन नाम फलक | होय | -- |
| | इतर | -- | | नाही | **१६** |
| | | -- | स्वतः करणारे | होय | **१६** |
| | | | | नाही | -- |

जमीन मिळालेल्या लाभार्थींनी ऊस, ज्वारी, कांदा इत्यादी पिके घेतली आहेत. या लाभार्थींनी बागायती शेतीसुध्दा केली असून जमिनीचा चांगला लाभ करून घेतला आहे.

**घरकुल योजना**

घरकुल योजनेअंतर्गत अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा व जामखेड तालुक्यातील लाभार्थ्यांच्या घराची पहाणी केली. सदर पाहणी मध्ये असे निदर्शनास आले की, **परिस** या स्वयंसेवी संस्थेमार्फत ज्या घरकुलांची बांधकामे चालू आहेत, त्या घरकुलांची स्थिती फारशी समाधानकारक नव्हती. काही ठिकाणी बांधकामे अर्धवट स्थितीत असून त्यांची गुणवत्ता तितकीशी चांगली नाही.

भेटीच्या दिवशी कर्जत तालुक्यातील घरकुलांच्या जागेचा प्रश्न सुटलेला असल्याचे त्यावेळी सांगण्यात आले. त्यामुळे सदरची घरकुले पावसाळ्यापूर्वी लाभार्थ्याला प्राप्त होतील अशी अपेक्षा आहे.

घरकुलांबाबत सर्वेक्षणाच्यावेळी खालील त्रुटी निदर्शनास आलेल्या होत्या.

(१) जुन्या घराला लागून १० X ८ ची खोली बांधलेली आहे व तेच नवीन घरकुल बांधल्याचे लाभधारकाकडून सांगण्यात आले.

(२) बांधकाम माती मिश्रीत वाळूचा वापर करून बांधलेले दिसून आले. काही ठिकाणी प्लॅस्टर अपूर्ण, फरशी बसविणे बाकी, संडास, बाथरुम बांधलेली नव्हती .

(३) अजनूज व बेलवंडी ता. श्रीगोंदा येथे लाभार्थी स्वतः बांधकाम करीत आहेत. त्यांना पुढील निधीचा हप्ता प्राप्त न झाल्याने बांधकाम अर्धवट राहिले आहे.

(४) काही घरकुलांचे साहित्य जागेवर पोहोच झालेले दिसून आले. त्यामध्ये विटा म्हणून सिमेंट ब्लॉकचा वापर करण्यात येणार आहे, तथापि ते ब्लॉक हाताने सुध्दा तुटत होते. त्यामुळे ते बांधकाम गुणवत्ता सुध्दा कमकुवतच होईल असे वाटते.

(५) घरकुल योजनेअंतर्गत या जिल्ह्यातील घरकुलांची कामे करण्यात येत आहेत ती सर्व कामे शासनाच्या विहीत मापदंडानुसार करण्यात आलेली नाहीत, असे निदर्शनास आले.

**एचडीइपी पाईप योजना**

HDPE पाईप ही योजना अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील एकूण ९ भूधारकांपैकी ७ जणांना देण्यात आली. तर कर्जत तालुक्यातील सर्व म्हणजे ६ ही भूधारकांना ही योजना देण्यात आली.

**(४.१२) योजनेत मिळालेल्या लाभाची स्थिती**

पहाणी केलेल्या लाभार्थींना मिळालेल्या पानाची टपरी, घरघंटी (पिठाची गिरणी), किराणा दुकान, सायकल मार्ट या बाबी सुस्थितीत आढळल्या. २/३ लाभार्थींनी स्वतःच्या फायद्यासाठी मिळालेले अनुदान खर्च केले असले तरी अशा घटना क्वचितच घडल्या आहेत.

मात्र शेळ्यांच्याबाबत काही लाभार्थींना शेळ्या देतानाच हलक्या प्रतीच्या व आजारी देण्यात आल्याचे लाभार्थींकडून सांगण्यात आले त्यामुळे बऱ्याचशा शेळ्या मरून गेल्या आहेत. तर काही लाभार्थींनी त्या विकल्या आहेत.

**पशुधन वाटप**

अहमदनगर जिल्ह्यात श्रीगोंदा तालुक्यात एकूण ५ लाभार्थींना गाई, म्हशी व ९ लाभार्थींना शेळ्या देण्यात आल्या. ५ लाभार्थींच्या शेळ्या मेल्या व २ लाभार्थींनी मिळालेल्या म्हशी विकून टाकल्या व त्या पैशातून मेंढ्या खरेदी केल्या असल्याचे सांगण्यात आले.

**(४.१३) योजनांमुळे झालेला फायदा**

पारधी समाजाला योजनांचा लाभ दिल्याने निश्चितपणे फायदा झाला. सुकामेवा विक्री, भाजीपाला विक्री, किराणा दुकान या व्यवसायांना असलेली भांडवलाची गरज काही अंशी तरी भागली. घरकूल योजनेमुळे बेघरांना घरे मिळाली.

भूमिहिनांना स्वाभिमान योजनेतून शेतजमिनी मिळाल्यामुळे काही लाभधारकांनी नगदी पिके घेण्यास सुरवात केली. ऊस, ज्वारी, कांदा या प्रकारची पिके घेतल्यामुळे त्यांच्या उत्पन्नात वाढ झाली.

HDPE पाईपमुळे सिंचन करणे सुलभ झाले व पाणी मिळाल्याने सिंचन क्षमता वाढून शेतीचा विकास झाला. फक्त शेळीगट वाटप या योजनेतील काहींच्या शेळ्या मरण पावल्याने त्यांना लाभ झाला नाही. असे असले तरी काही लाभधारकांना या योजनेचा देखील फायदा झाल्याचे दिसून आले. एका लाभार्थ्याने दूध काढता येत नसल्याने म्हशी विकल्या. इतरांना गाई, म्हशी पासून लाभच झाल्याचे आढळले.

## प्रकरण क्रमांक ५

## योजना राबविण्यात आलेल्या अडचणी व शिफारसी

योजना राबवितांना जेव्हा कोणत्याही वस्तूच्या स्वरूपात लाभार्थ्याला सहाय्य दिले जाते तेव्हा त्या वस्तूचा दर्जा उत्कृष्ट राखण्याची काळजी घेतली गेली पाहिजे. तसेच लाभार्थ्याला दर्जेदार व गुणवत्तापूर्ण सहाय्य करणे आवश्यक आहे.

मात्र दर्जा हाच या योजनेच्या यशातील मुख्य अडसर ठरतो व त्यामुळे शासनाची विश्वासार्हता कमी होते. पर्यायाने लाभार्थी त्रस्त होतात.

पारधी समाजाला दिलेल्या योजनांत लाभार्थींना दिलेल्या शेळ्यांच्या गुणवत्तेबाबत अनेक लाभार्थींनी तक्रारी केल्या. एका लाभार्थ्याने तर शेळ्यांची नित्कृष्ट प्रत पाहून शेळ्या नाकारल्या. हलक्या प्रतीच्या शेळ्या या वातावरणात तग धरू शकल्या नाहीत. या कारणामुळे लाभार्थी लाभापासून वंचित राहीले. ज्यांच्या शेळ्या जगल्या त्यांना फायदा झाला.

शेळीगट पुरवठा ही योजना चांगली असली तरी लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देताना पुरवठ्याचा दर्जा राखणे गरजेचे आहे.

बेघरांना घरे मिळाल्याने त्यांना आसरा मिळाला, पण ही सोय तात्पुरत्या स्वरूपाचीच असल्याचे निदर्शनास आले. कारण घरासाठी वापरलेल्या विटा हाताने दाबल्या असता फुटत होत्या. अशा विटांनी बांधलेल्या घराकडून लाभार्थींची निवाऱ्याची अपेक्षा कशी पूर्ण होणार ? ही मोठी अडचण आहे. यामुळे भविष्यात हे या योजनेचे लाभार्थी फक्त अपघाताचे बळी ठरतील.

यासाठी लाभार्थ्यांना घरे बांधून न देता घर बांधण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवून बांधकामाच्या प्रगतीच्या टप्प्यानुसार त्यांना अनुदानाचा हप्ता देणे अधिक श्रेयस्कर ठरेल. त्यामुळे त्यांना रोजगार उपलब्ध होईलच व मुख्य म्हणजे अशा बांधकामाच्या गुणवत्तेची काळजी लाभार्थ्यांकडून घेतली जाईल.

त्याचप्रमाणे शेळीगट वाटप करताना देखील लाभार्थ्यांच्या पसंतीने अनुदानाच्या मर्यादेत त्यांना शेळीगट खरेदी करू द्यावा.

अशा पर्यायामुळे ठेकेदारांच्या नफेखोरीच्या कृतीमधून लाभार्थ्यांची कायमस्वरूपी सुटका होऊ शकेल. व त्यांना योजनांचा खराखुरा लाभ मिळण्यातील अडचणी दूर होतील.

## प्रकरण क्रमांक ६

## निष्कर्ष

पारधी समाजाच्या उन्नतीसाठी महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विभागाकडून आर्थिक लाभाच्या योजना राबविण्यात आल्या.

त्यामुळे पारधी समाजाच्या व्यावसायिकांना भांडवलाचा पुरवठा झाला.

सुकामेवा, भाजीपाला विक्री असे व्यवसाय आधीपासून जे लाभार्थी करत होते, त्यांच्या धंद्याला बळ मिळाले. ज्यांनी नव्याने व्यवसाय सुरू केला, त्यांना रोजगार उपलब्ध झाला.

स्वाभिमान योजनेमध्ये मिळालेल्या शेतजमिनीमुळे शेतीचे उत्पन्न मिळवणे शक्य झाले. तसेच त्यांना जमिनीची स्वमालकी मिळाल्यामुळे त्यांना कायमस्वरूपी शाश्वत उत्पन्नाचा मार्ग उपलब्ध झाला.

एचडीइपी पाईपमुळे शेतीच्या सिंचनात वाढ झाली व त्यामुळे त्यांचे उत्पन्न वाढले.

घरकुले व शेळीगट वाटप या योजना ठेकेदारांच्या विळख्यातून सोडविणे आवश्यक आहे. तसेच ज्या योजनांना अनुदान दिले जाते त्यांचा योग्य विनियोग होतो की नाही याकडे आदिवासी विकास कार्यालयाच्या निरीक्षकांनी विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. तसेच याबाबत संबंधित योजना योग्य प्रकारे राबविल्या जाणे आवश्यक आहे.